
# समाजस्वास्थ्य

संपादक
र. धों. कर्वे. एम्. ए.

किंमत
३
आणे

## अनुक्रमणिका


| विषय | पृष्ठ |
|---|---|
| १ मानसशास्त्राचें थोतांड-७ | ...१०५ |
| २ सोलापूरची पत्रकार परिषद | ...१०८ |
| ३ कैफियत-६ ... ... | ...१११ |
| ४ 'संन्याशाचें लग्न', पहिले प्रयोग | ...११३ |
| ५ ग्रंथपरीक्षण ... ... | ...११४ |
| ६ पत्रव्यवहार ... ... | ...११६ |
| ७ शारदेचें पत्र ... ... | ...११८ |

वर्ष १८
अंक १० वा
एप्रिल १९४५

## वर्गणीची माहिती

हें मासिक दर माहिन्याचे १५ तारखेस प्रसिद्ध होतें. सध्यां पानें कमी झालीं आहेत, तथापि पुढें भरून काढण्याची आशा असल्यामुळे वर्गणी पूर्वीइतकीच म्हणजे दोन रुपये ठेवली आहे. व्ही. पी. ने सवादोन. पोर्तुगिज प्रांतांत किंवा हिंदुस्थानाबाहेर सध्यां पाठवतां येत नाही. वर्गणीबद्दल पोस्टाचीं तिकिटें चालणार नाहीत. मनीआर्डरीने दोन रुपये पाठवावे. पुणें येथील ग्राहकांनी ६९-१, लॉ कॉलेज रोड, येथें वर्गणी भरल्यास चालेल. अंक न पोंचल्याची तक्रार महिना संपण्याचे आंत मिळाली पाहिजे. नमुना अंक फुकट.

**राजिट अेजन्सी, १३, नवी भटवाडी, मुंबई ४.**

## स म ता सं घ

हा पुणें येथे स्थापन झाला आहे. याचे उद्देश थोडक्यांत पुढील-प्रमाणें आहेत. १ विशेषत: महाराष्ट्रामधें समतेच्या तत्वाचा प्रसार करणें. २ या कामीं लोकमत तयार करण्यांसाठी व्याख्यानें करवणें, पत्रकें, पुस्तिका व अेखादें नियतकालिक प्रसिद्ध करणें. ३ भिन्नजातीयांमधें, भिन्नधर्मीयांमधें व आर्थिक दृष्ट्या भिन्नवर्गीयांमधें दळणवळण व स्नेहसंबंध उत्पन्न व्हावे म्हणून सभा, संमेलनें भरवणें, वगैरे. अधिक माहितीकरतां 'समता-संघ कचेरी, ६१६ शनवार पुणें २,' या पत्त्यावर लिहावें. **अध्यक्ष, प्रो. धों. के. कर्वे.**

अश्लीलता हा कोणत्याही लेखाचा, चित्राचा किंवा इतर वस्तूचा गुण नसून तो फक्त तसा आरोप करणारांच्या मेंदूचा गुण होय.

# मानसशास्त्राचें थोतांड–७

फक्त अन्न मिळवण्याची अेक बाब सोडली, तर प्राणी म्हणजे यंत्रेंच आहेत आणि शास्त्रीय नियमांप्रमाणेंच त्यांच्या सर्व हालचाली होतात, याचें अेक उत्तम उदाहरण लोअेब याने दिलें आहे. कित्येक लहान प्राण्यांवर त्याने असे प्रयोग करून पाहिले की त्यांच्यासमोर दोन दिवे ठेवून दोन्ही डोळ्यांवर सारखाच प्रकाश पडेल असें केलें. अशा स्थितींत प्राणी सरळ पुढें चालतो. पण यांत किंचित् फरक करून अेका बाजूचा प्रकाश जास्त केला, तर तो त्या दिशेने चालूं लागतो. यावरून कोणाची अशी कल्पना होअील की त्याला उजेड आवडतो म्हणून तो तिकडे जातो. परंतु ही आवड केवळ यांत्रिक स्वरूपाची असते आणि अशाच तऱ्हेने वागणारीं यंत्रेंही तयार केलेलीं आहेत. त्यांत मनाचा संबंध नसतो. आणि अितक्या लहान प्राण्यांना मन असतें असें कोणी म्हणणारही नाही. डोळ्यांच्या व मज्जातंतूंच्या रचनेमुळे त्यांना उजेडाकडे जावेंच लागतें. मात्र शरीररचना अशीही असूं शकते की तो प्राणी उजेडापासून दूर जाअील. याचें पुढील उदाहरण पाहिल्यास कळून येअील की प्राणी आपल्या अकलेने अन्न मिळवतो हा देखील पुष्कळ वेळां भ्रमच असतो. कांही कीटक झाडाच्या खालच्या फांद्यांवर आपलीं अंडीं घालतात आणि या अंड्यांतून किडी बाहेर पडतात. यांची रचना अशी असते की भूक लागली म्हणजे त्या उजेडाकडे जातात व पोट भरलें म्हणजे उजेडापासून दूर जातात. यामुळे नैसर्गिक स्थितींत त्यांना भूक लागली म्हणजे त्या झाडाच्या वरच्या फांद्यांवर चढतात आणि तेथील कोंवळीं पानें व कळ्या खातात. पोट भरल्यामुळें त्यांच्या शरीरांत जो फरक होतो, त्यामुळे त्यांना उजेडापासून दूर जावेंसें वाटतें आणि त्या पुन्हा खाली

उतरतात. ही यांत्रिक गोष्ट आहे, अकलेने केलेली नव्हे, हें पुढील प्रयोगावरून दिसेल. या किडींना अेका कांचेच्या नळींत ठेऊन नळीच्या अेका टोंकाला जास्त उजेड ठेवला आणि त्यांचें अन्न दुसऱ्या टोंकाला ठेवलें, म्हणजे नैसर्गिक स्थितींत उजेडाच्या बाजूला अन्न असतें, त्याच्या उलट स्थिति येथे झाली. तरी देखील भूक लागली म्हणजे या किडी अन्नाच्या बाजूला न जातां उजेडाच्या बाजूला जातात असें आढळलें. अर्थात् तेथें अन्न सांपडत नाही, आणि अशा स्थितींत त्या भुकेनें मरतील, कारण अन्न शोधून काढण्याची अक्कल नाही. मनुष्या-सारख्या वरच्या दर्जाच्या प्राण्यांचे बाबतींत शरीररचना अधिक भानगडीची असते, पण तरी देखील अन्न शोधून काढणें ही शरीराचीच क्रिया आहे, त्यांत अकलेचा कांहीं संबंध पोंचत नाही.

आपल्याला होणारी जाणीव म्हणजे मेंदूच्या हालचालींचा अेक परिणाम आहे, पण या जाणिवेमुळे आपल्या वागणुकींत कांहीं फरक पडतो असें नाही. ही जाणीव नसती आणि बाकीची शरीररचना तशीच असती, तर माणसें हल्ली-प्रमाणेंच वागलीं असतीं. आपण विचाराने वागतों असें आपल्याला वाटतें, परंतु अितर प्राणे विचार करतात असें आपण मानीत नाही आणि आपली शरीर-रचना अितर प्राण्यांसारखीच आहे. जाणीव ही केवळ आगंतुक गोष्ट आहे, तिचा वागणुकीशीं कांहीं संबंध असतो हा आपला भ्रम आहे.

आपली कोणतीही कृति मज्जातंतूंतून जरूर तो संदेश गेल्यानंतरच होऊं शकते. ही कृति संवयीची असेल, तर या संदेशाचा मार्ग तयार झालेला असतो आणि अशी कृति जाणिवेशिवायही होते. ती संवयीची नसेल, तर संदेशाकरतां नवीन मार्ग तयार व्हावा लागतो आणि हा तयार होण्यास जो वेळ लागतो, त्यांत आपण विचार करतों आहोंत असा आपल्याला भास होतो, आणि तो तयार झाला म्हणजे आपल्या विचाराचा निष्कर्ष निघून आपण त्याप्रमाणें वागलों असें आपल्याला वाटतें. कठिण प्रश्न सोडवल्यावर आपल्याला समाधान होतें, याचें कारण तो अगदी नवीन प्रकारचा प्रश्न असतो आणि मेंदूंत त्याला योग्य

मार्ग तयार होण्यास अधिक वेळ लागतो आणि या अवधींत मेंदूंत ज्या धडा-मोडी चालू राहतात, त्यांनी आपल्याला त्रास होत असतो. हा त्रास तो मार्ग तयार झाल्याबरोबर संपतो आणि म्हणून तें समाधान वाटतें.

स्त्रियांच्या मेंदूचें वजन सामान्यतः पुरुषांपेक्षा कमी असतें आणि स्त्रियांच्या व पुरुषांच्या वागणुकींत जो फरक दिसतो तो यामुळेच असावा असा तर्क करण्यास हरकत नाही. मेंदूचा आकार आणि वजन जितकीं जास्त असतील, तितक्या त्यांतल्या घडामोडी अधिक भानगडीच्या असतात आणि म्हणून मार्ग तयार होण्यास अधिक वेळ लागतो आणि म्हणूनच अेखाद्या गुंतागुंतीच्या प्रश्नाचा निकाल करण्यास पुरुषानां अधिक वेळ लागतो, म्हणजे पुरुष जास्त विचारी असतात असा भास होतो आणि लोकांचा अनुभवही असाच आहे. तसेंच स्त्रियांचें कार्यक्षेत्र अधिक मर्यादित असतें, याचाही परिणाम याच दिशेने होत असावा. असाच फरक सामान्य मनुष्याच्या आणि विद्वान मनुष्याच्या वागणुकींत दिसेल. विद्वान मनुष्याचें कार्यक्षेत्र जास्त मोठें असल्यामुळे, किंवा मेंदूही अधिक वजनदार असल्यामुळे, त्याला निर्णय करण्यास अधिक वेळ लागतो आणि तो अधिक विचार करतो असें दिसतें. पण हा केवळ भ्रम आहे.

मन व शरीर हीं दोन वेगळीं आहेत असें मानण्यास कोणतेंही कारण नाही हें येथपर्यंत पाहिलें. आत्म्यासंबंधी ज्या जुन्या वेडगळ समजुती कित्येक शतकें किंवा सहस्रकें चालत आल्या आहेत, त्यांचाच अवशेष म्हणजे मनासंबंधी समजूती. या समजुतींना जरी बिलकुल आधार नाही असें आपण पाहिलें, तरी अजून विद्वानांनाही याचा उमज पडलेला नाही. मन हें काल्पनिक असल्यामुळे त्यासंबंधी अनेकांनी अनेक विचित्र विधानें केलेलीं आहेत. कोणी म्हणतो मनाचा व शरीराचा अेकमेकांवर परिणाम होतो; कोणी म्हणतो मनाच्या व शरीराच्या क्रिया समांतर मार्गांनी चाललेल्या असतात, तरीपण दोन्ही स्वतंत्र आहेत; कोणी म्हणतो की अितर प्राण्यांपासून मनुष्याची उत्क्रांति होतांना मधें कोठेतरी मन उत्पन्न झालें. याशिवाय मानसशास्त्राचे अनेक पंथ आहेतच आणि सर्वांत

विलक्षण म्हणजे मनोविश्लेषणशास्त्र. या शास्त्राला पाया नाही आणि कल्पना-शक्तीला मोकळी सोडल्यामुळे यांत अगणित पंथ आहेत. मन असें कांही नाही, हें अेकदां समजलें म्हणजे हा सर्व निरर्थक खटाटोप पाहून हंसूंच येतें व विशेषतः तथाकथित मानसशास्त्र्यांच्या घमेंडीचें विशेष हंसूं येतें, कारण केवळ शारीरशास्त्रापेक्षा आपलें ज्ञान विशेष उच्च दर्जाचें आहे अशी त्यांची कल्पना असते.

मन हा शब्द वापरणें असेल तर तो शरीराचें अेक कार्य या अर्थानेच वापरला पाहिजे. मनाचा शरीरावर अंमल चालतो असें कांहींना वाटतें, पण तें हास्यास्पद आहे. कार्याचा परिणाम कारणावर होणें शक्य नाही. मन स्वतंत्र नाही, तें सर्वस्वी शरीरावर अवलंबून आहे. सारांश मन आणि शरीर अशा द्वंद्वाची कल्पना आतां सोडून दिली पाहिजे आणि शरीर म्हणजेच सर्व कांही आहे हें ओळखलें पाहिजे. कितीही उच्च दर्जाचा मनुष्य असला, मग तो राजा असो, मुत्सद्दी असो, किंवा शास्त्रज्ञ असो, तो परिस्थितीवर अंमल चालवूं शकत नाही. तोच सर्वस्वी परिस्थितीच्या आधीन असतो. ‘ राजा कालस्य कारणं ’ हें वाक्य किती हास्यास्पद आहे हें यावरून दिसेल. मनुष्याची व समाजाची कोण-तीही कृति सर्वस्वी परिस्थितीवर अवलंबून असते आणि या परिस्थितीवर मनु-ष्याचा यत्किंचितही अंमल चालत नाही. जुन्या लोकांच्या वेडगळ समजुतींना आपण हंसतों. मनासंबंधीच्या आपल्या समजुतींना आपले वंशज तसेच हंसतील, कारण या समजुती तितक्याच हास्यास्पद आहेत. ( समाप्त )

---

# सोलापूरची पत्रकार परिषद्

स्वागतमंडळाच्या तत्परतेने ही परिषद् अत्यंत यशस्वी रीतीने पार पडली. त्यांत वैगुण्य अेकच होतें की मार्चचे अखेरचे दिवस आल्यामुळे अति-शय उकडत होतें, अेरवीं प्रतिनिधींची सर्व व्यवस्था उत्तम होती. याचें बरेंच

श्रेय तेथील महिलामंडळाला दिलें पाहिजे, कारण भोजनाची सर्व व्यवस्था या मंडळाने आपण होऊन मागून घेतली होती. अशा प्रकारचें हें पहिलेंच उदाहरण असावें. तेथील मोटर युनियनने प्रतिनिधींची नेआण करण्याची व्यवस्था केली अितकेंच नव्हे तर त्यांना मुद्दाम बोलावून चहा व फलाहार दिला. करमणुकीचा पहिल्या दिवशींचा कार्यक्रम प्रथम बराच कंटाळवाणा झाला. श्री. भोंडे यांच्या नकला आतां पूर्वीप्रमाणें होत नाहीत, तेव्हां या वृद्धापकालांत त्यांना लोकांनी बोलावून त्रास देऊं नये हें बरें. स्थानिक नकलाकार श्री. पतकी यांनी मात्र दोन नकला उत्तम केल्या. श्री. नानिवडेकर आमचेबरोबरच मुंबअीहून गेले होते, पण त्यांना आपली शाहिरी दाखवण्याची संधि मिळेपर्यंत पहाटेचे तीन वाजायला आले आणि त्यांनी वरेरकरकृत 'उमाजी नाअिकाचा पोवाडा' जरी आपल्या खड्या सुरांत उत्कृष्ट म्हटला, तरी लोक कंटाळलेले असल्यामुळे त्याचें व्हावें तसें चीज झालें नाही.

परिषदेचा मुख्य कार्यक्रम प्रभात पटगृहांत झाला. ठरावांचा बराच खल जरी अगोदरच विषयनियामक समितींत झाला होता, तरी खुल्या अधिवेशनांत बरींच रणें माजलीं आणि निदान दोन वेळां तरी अध्यक्षांना दडपशाही करावी लागली. पत्रकारांच्या आर्थिक स्थितीसंबंधीं ठराव भाअी जोगळेकर यांनी आपल्या नेहमीच्या आवेशांत मांडला आणि अमुक मुदतीपर्यंत मालकांनी दाद घेतली नाही तर संप करण्याचा उपदेश केला. परिषदेची नवीन घटनाही पास झाली, पण अध्यक्षांच्या निवडणुकीच्या बाबतींत मुंबईच्या संघाने लोकशाहीच्या तत्वाला धरून जी नवीन योजना मांडली होती, ती नापास करून आपण लोकशाहीला अजून नालायक आहोंत असें पत्रकारांनी सिद्ध केलें. ही पत्रकारांची स्थिति, तर अितर जनतेची काय असेल हें सांगायला नको. पत्रकार हे समाजाचे नेते समजले जातात, त्यांनी यापेक्षा अधिक अक्कल दाखवायला पाहिजे होती.

आणखी अेक ठराव विशेष गाजला, पण शेवटीं अध्यक्षांनी आपल्या अधिकाराबाहेर जाऊन सभेच्या बहुमताने तो परत घेण्यास परवानगी दिली.

वास्तविक सभेने अेकमताने परवानगी दिल्याशिवाय ठराव परत घेतां येत नाही, परंतु हा ठराव परत घ्यावा अशी अिच्छा अध्यक्षांनीच प्रदर्शित केली होती आणि म्हणूनच त्यांनी नियम धाब्यावर बसवून तो परत घेऊं दिला. ही अेरेरावी अत्यंत अनुचित होती. हा ठराव श्री. आप्पा पेंडसे यांनी मांडला होता आणि त्यांत धुळें येथील साहित्यसंमेलनांत 'नवयुग' पत्राच्या निषेधाचा जो ठराव झाला होता, त्याबाबत त्या संमेलनाचा निषेध केला होता. यावर चर्चा झाल्या-नंतर श्री. पेंडसे यांनी उत्तर देतांना बरींच चुकीचीं विधानें केलीं, तेव्हां 'तीं खोडून काढण्याची संधि मला द्यावी, किंवा येथें हजर असलेले धुळें येथील संमेलनाचे अध्यक्ष मामा वरेरकर यांना बोलण्याची विनंति करावी' असें आम्ही अध्यक्षांस सुचवलें. वस्तुतः हें नियमबाह्य होतें, कारण ठराव मांडणाराने उत्तर दिल्यावर कोणालाही बोलण्याची परवानगी नसते, आणि याचाच फायदा घेऊन श्री. पेंडसे यांनी आपल्या शेवटच्या उत्तरांत चुकीचीं विधानें केलीं होतीं. परंतु या वेळीं अध्यक्षांनी वरेरकरांना बोलण्याची विनंति केली आणि हें नियम-बाह्य असल्याबद्दल आरडाओरडा झाला, तेव्हां सभेचें मत घेतलें आणि वरेर-करांना बोलूं देण्याबद्दल प्रचंड बहुमत पडल्यामुळें आपण सभेच्या मताप्रमाणें वागत आहों असें समर्थन अध्यक्षांनी केलें. वरेरकरांच्या लहानच भाषणाचा अितका परिणाम झाला की आतां आपला ठराव पास होत नाही असें पाहून श्री. पेंडशांनी तो परत घेतला. त्याचबरोबर श्री. नवरे यांनी त्याला अेक पुस्ती जोडण्याकरतां उपसूचना दिली होती, तीही आपोआप पडली. ती अशी कीं 'धुळें येथील अध्यक्षीय निवडणूक व संमेलन यांबिषयी 'नवयुग' पत्राने ज्या पद्धतीने प्रचार केला, ती वृत्तपत्राच्या दर्जास कमीपणा आणणारी आहे असें या परिषदेचें मत आहे.'

परत येतांना कांही यूरोपीय सद्गृहस्थांनी आमच्यावर मेहरबानी केल्या-मुळेच आम्हास मद्रास मेलमधें जागा मिळाली, अेरवीं पुढील गाडीपर्यंत म्हणजे सात तास वाट पहावी लागली असती.

---

# कैफियत–६

लेखक, हितेच्छु.

**प्रास्ताविक.** शहरांतल्या गुळगुळीत वातावरणांत थोडेसें खुट् झालें की सभा, व्याख्यानें, अभिनंदन किंवा निषेध यांना ऊत आणणाऱ्या लोकांनी खेड्यांत जाऊन वस्तुस्थिति पाहून यावें, म्हणजे कित्येक वयस्क नवरे धर्मसिंधूतील जाड्या कलमांचा आधार घेऊन तरुण मुली कशा पटकावतात तें त्यांना कळून येईल.

मुलीचा बाप मुलीला खायला, प्यायला व ल्यायला चांगलें असावें हेंच पहात असतो. मुलगी उजवणेंच आधी कठिण, बरें लग्नाशिवाय वाढलेली मुलगी घरीं ठेवणें त्याहूनहि कठिण! शिक्षणाचे योग्य ते संस्कार होऊन त्याप्रमाणें वागण्याचें धैर्य किती जणांना असतें? शिवाय अशा तऱ्हेचा प्रसंग तिच्या आयुष्यांत पहिला व शेवटलाच असतो. मुलांमुलींना वास्तवतेची कल्पना देणें हें आपणाला समजलें असलें तरी अजून उमजलें मात्र नाही. तात्पर्य मुलगी शिक्षित असो अगर अशिक्षित असो, वेळेवर काय करावें हें तिला समजत नाहीं व वाटेल त्या दिव्याला ती तयार होते. पुष्कळदां परिस्थिति अितकी असह्य होते की तिला जीव नकोसा होतो. शिवाय भोंवतालचें वातावरण नेहमीच प्रामाणिक असतें असें नाहीं. तात्पर्य ती कोणाच्या ना कोणाच्या आहारीं जाते व ग्रंथ आटोपतो. कालांतराने तो प्रसंग व तीं माणसें शिळीं होतात व समाज तें विसरून जातो. कारण तोंपर्यंत अनेक ताज्या भानगडी लक्ष वेधायला तयार झालेल्या असतात.

बारा भावंडांपैकी सहा बहिणींत माझा नंबर शेवटचा. वरच्या पांच बहिणींची विल्हेवाट लावतां लावतां वडिलांच्या नाकीं नऊ आले. र, ट, फ करीत मीहि पंधरा वर्षांची झालें. आमच्या नातलगांपैकीच अेका बिजवराची निवड माझ्याकरतां केली गेली. त्यांना सरकारी नोकरी असून पगारही चांगला होता,

त्यामुळे त्यांच्या वयाकडे व अितर बाबींकडे कोणाचें लक्ष गेलें नाही म्हणण्यापेक्षा दुर्लक्षच केलें गेलें. उलट मुलीला स्थळ चांगलें मिळालें असेंच सर्व म्हणूं लागले.

त्यांना पहिल्या कुटुंबापासून अेक मुलगी होती, मुलगा नव्हता. अर्थात् त्यांच्या व जगाच्या दृष्टीने याही वयांत लग्न करायला तें अेक सबळ कारण होतें. खेड्यांतून अेकदम मुंबअींत रहायला आलें. उतार वयांत केलेली तरुण पत्नी. खाणें, पिणें, कपडे, सिनेमा व नाटकें यांची विपुलता. त्यांची मुलगीहि आधीच सासरीं गेलेली. त्यामुळे राजाराणीच्या संसारांत न्यून किंवा अडचण अशी नव्हतीच. नातलगांनी यावें, खावें, प्यावें व सगळी मुंबई भटकून परत जावें. त्यांना दौऱ्याची नोकरी असल्यामुळे आठवड्यांतून तीनचार दिवस ते बाहेर असत. त्यामुळे उरलेले तीन दिवस कसे जात हे समजत देखील नसे. याप्रमाणें चारपांच वर्षें केहांच निघून गेलीं. आतां मात्र त्यांच्याने राहवेना. मूल न झाल्यामुळे ते खट्टू झालेले दिसले. सुरवातीच्या पांच वर्षांत मला आजार होत, पण सवत अशीच बाधते असें म्हणून कोणी तिकडे फारसें लक्ष दिलें नाही. आतां मात्र माझ्या आजाराविरुद्ध जोराची मोहीम सुरू झाली. ऑपरेशन्स झालीं, अिंजेक्शन्स झालीं, पण मूल नाहीं. त्यांच्यांत कांही वैगुण्य असावें असें सांगणारा मात्र अेकही डाक्तर मिळाला नाही. मी त्या विवंचनेंतच होतें. माझा जवळचाच अेक नातलग वैद्यकीय शिक्षण घेत होता. त्याला माझा सगळा अितिहास सांगितला. त्याने मात्र मला नक्की सांगितले की या नवऱ्यापासून तुला संतति होअील असें वाटत नाही. माझ्या सर्व बहिणींचा वर्षास पाळणा हालायचा, मी मात्र मुलाशिवाय, दुर्दैव माझें!

अेवढ्यांत पेन्शन घ्यायची वेळ आली. लहानशा गांवीं घर वगैरे बांधून राहूं लागलों. जिवाची मुंबई करतांना मागेंपुढें पाहिलें नव्हतेंच. दिवसेंदिवस ते खंगत चालले. त्यांतच त्यांचा अंत होऊन अठ्ठाविसाव्या वर्षी मी विधवा झालें. थोडीशी पुंजी मागें शिल्लक आहे, जेमतेम पोट भरेल. सध्यांतरी नातलग या,

या, म्हणताहेत. पण तें सर्व माझ्याजवळ दोन पैसे असेपर्यंतच, हें मी ओळखतें. सावत्र मुलगी व जांवअी यांच्याशीं ते असतांनाच फाटलें होतें. तीं मला काय मदत करणार ? तारूं भटकतें आहे, कोठे जाऊन आपटेल तें आतांच काय सांगूं ?

---

# 'संन्याशाचें लग्न': पहिले प्रयोग

मामा वरेरकरांचें हें नवीन नाटक किर्लोस्करांच्या सौभद्र नाटकामुळे लोकप्रिय झालेल्या कथानकावरच रचलेलें असलें, तरी त्यांत कांही महत्वाचे फरक केलेले आहेत. तथापि मूळ नाटकाची आठवण करून देण्याकरतां त्यांतलीं कांही वाक्यें जशींच्या तशींच ठेवलेलीं आहेत. सौभद्र नाटकांत कृष्णाने अेक पत्र सुभद्रेची खोटी सही करून अर्जुनाला लिहिलेलें दाखवलें आहे. तसेंच पत्र या नाटकांत प्रत्यक्ष सुभद्रेनेंच लिहिलें आहे. तसेंच सौभद्रांत कृष्ण आपलीं सगळीं कारस्थानें उघड बोलून दाखवतो, या नाटकांत तो नामानिराळा राहतो. आणि सर्वांत महत्वाचा फरक म्हणजे अर्जुन ऊर्वशी-जवळ नृत्यकला शिकला होता यावर या नाटकांत भर दिला आहे. बलिराम आपली बहीण त्याला देत नाही तो यामुळेच, आणि रुक्मिणी शेवटीं संन्यासी अर्जुनाला आपलें ढोंग कबूल करायला लावते, तेंही नृत्यकलेच्याच जोरावर. अर्थात् या नाटकांत नृत्य आहे, पण तें असावें तसें नाही असें दुर्दैवाने म्हणावें लागतें. यांत नर्तिकांचा मेळा बलिरामापुढें नृत्य करतो, पण वयांत न आलेल्या बालिका कोणत्या राजापुढें नर्तिका म्हणून येऊं शकतील ? नाटकांतले राजे पुष्कळ वेळां मूर्ख असतात, पण मूर्ख राजांना देखील अितकी अक्कल असते. ही नृत्याची चेष्टा आहे आणि हल्ली कोठेही नृत्य म्हटलें की ही चेष्टाच पहावी लागते. ही अेक गोष्ट वगळली तर हें नाटक घाईने बसवल्याचीं स्पष्ट चिन्हें दिसत असूनही पहिल्याच प्रयोगाचे वेळीं त्याने प्रेक्षकांच्या मनाची पकड घेतली यांत शंका नाही. लोकप्रिय कथानक व वरेरकरांसारख्या कसलेल्या लेखकाने लिहिलेले संवाद असल्यावर नाटक लोकप्रिय होअील अशी अपेक्षा होतीच,

तरीपण याचें श्रेय त्यांतल्या कांहीं नटनटींनाही दिलें पाहिजे. अर्जुन (दत्ताराम), नारद (अनंत वर्तक), रुक्मिणी ( नलिनी डेरे ) यांचीं कामें लोकांना विशेष आवडलीं. अितर पात्रांनी मेहनत घेतल्यास त्यांचीं कामें यापेक्षा चांगलीं होणें शक्य आहे. अेक सार्वत्रिक दोष म्हणजे कोणतेंही अेक पात्र बोलत असतांना अितर सर्व पात्रांचें लक्ष तिकडे असलें पाहिजे, आणि त्याचा परिणाम त्यांच्या चेहऱ्यावर दिसला पाहिजे, अिकडे कसलेल्या नटांचेंही दुर्लक्ष होतें. केवळ आपलें वाक्य कोठे आहे हें लक्षांत ठेवून तेवढें बरोबर म्हटल्याने नटांची जबाबदारी संपत नाही. शिवाय कित्येक नट वाक्यें जशींच्या तशींच न म्हणतां त्यांत आपली अक्कल चालवतात, परंतु याने नाटककाराला अन्याय होतो अितकेंच नव्हे तर अितर पात्रांना योग्य सूचना न मिळाल्यामुळे त्यांचा घोटाळा होतो. या साध्या गोष्टी आहेत, परंतु महत्वाच्या आहेत आणि प्रयोगाच्या यशावर त्यांचा अतिशय परिणाम होतो. सौभद्रासारखे जलसे या नाटकांत नाहीत, परंतु हा दोष नव्हे. या नाटकाची योग्यता सौभद्रापेक्षा कमी नाही आणि हेंही तितकेंच लोकप्रिय होअील असा अंदाज दिसतो. **र. धों. क.**

---

# ग्रंथपरीक्षण

**१. तोंडमिळवणी**; लेखक, भा. वि. वरेरकर; प्रकाशक. नवभारत प्रकाशनसंस्था, मुंबई-४. पृ. २११, किंमत ४ रुपये.

या कादंबरीचीं कांही प्रकरणें ' समीक्षक ' मासिकांत प्रसिद्ध झालीं होतीं, ती नुकतीच पुस्तकरूपाने बाहेर पडली आहे. यांतील बहुतेक मुख्य पात्रें कालेजच्या वातावरणांतलीं आहेत. शारदेचें लग्न जुन्या पद्धतीप्रमाणें होऊन नवरा शिक्षणाकरतां आणि नोकरीकरतां मुंबईत, आणि ती सासऱ्याकडे राहिल्यामुळे नवऱ्याची गांठ एक मुलगी होण्यापुरतीच पडली होती, आणि जेव्हां नाअिलाज म्हणून त्याने तिला मुंबईला आणली, तेव्हां तो अेका रखेलीच्या

ताब्यांत गेला होता. ही रखेली चंपा सहृदय व समंजस असल्यामुळें तिला शारदेबद्दल सहानुभूति वाटली आणि तिच्या मुलीला ( तारिणीला ) तिचा लळा लागला. नंतर नवरा बरेच पैसे मागें ठेवून दारूपायीं मेला आणि चंपाच घरचा कारभार पाहूं लागली आणि शारदा लेखिका झाली. तारिणी पुढें कालेजांत गेली आणि अेका वर्षी अिब्सेनचें 'डॉल्स हाउस' हें नाटक अिंग्रजींत करण्याचें ठरलें, परंतु तें तिला पसंत नसल्यामुळे ती त्यांत सामील न होतां स्वतःच त्याचें मराठी भाषांतर करून त्यांत तिने काम करून वाहवा मिळवली. कालेजांत गोपीनाथ आणि मधुकर हे तिच्या बरोबरच होते. गोपीनाथाची व तिची मैत्री झाली व तो तिला अभ्यासांत मदत करूं लागला. ती बी. अे., अेम्. अे. आणि डी. लिट्. झाली. गोपीनाथाचें लग्न शरयू नांवाच्या मुलीशीं ठरलें होतें. नंतर त्याचें तारिणीवर प्रेम बसलें, पण ती साध्य नाही असें पाहून त्याने तिसऱ्याच अेका खेडवळ मुलीशीं लग्न केलें. अिकडे मधुकर मोठा धूर्त व आपमतलबी असल्यामुळे त्याने शारदाबाअीशीं ओळख करून घेऊन तिच्या लेखकाचें काम तो विनामूल्य करूं लागला. तिच्या वजनाने आपल्याला तिचा घरजांवअी होतां येअील असें त्याला वाटलें होतें, पण तो बेत फिसकटला, कारण तितक्यांत कालेजांतल्या ग्रंथालयावर नेमलेल्या काशीनाथाशीं तारिणीची ओळख झाली आणि हळूहळू त्यावर तिचें प्रेम बसलें. हा पूर्वी गोपीनाथाचा गरीब नातेवाअीक म्हणून त्याच्याकडे रहात असे, पण त्याने शरयूला दगा दिल्यामुळे तो तेथून भांडून निघाला आणि शेवटीं चंपेने त्याला शारदाबाअींकडेच रहायला बोलावून घेतला. त्याने टोपणनांवाने केलेलें लिखाण अतिशय उच्च दर्जाचें होतें आणि त्याचें नांव उघडकीस आल्यावर शारदाबाअीलाहि त्याच्याबद्दल आदरच वाटूं लागला आणि शेवटीं तारिणीने त्याच्याशीं लग्न केलें. शरयू ही रखेलीची मुलगी होती. गोपीनाथाने फसवल्यामुळे ती चिडली होती आणि नंतर त्याची बायको मरून तो तिला पुनः मागणी घालण्याकरतां आला, तेव्हां त्याला तिने धुडकावून लावलें आणि पुरुषजातीवर सूड घेण्याकरतां लग्न करण्याअैवजी रखेला ठेवण्याचें ठरवलें आणि ही जागा मधुकरने पतकरली. लेखकाचे नेहमीचे विचार आणि

पद्धत जरीं यांत दिसली, तरी कित्येक ठिकाणीं निष्काळजीपणा दिसतो. उदा० पृ. ३८ वर शारदाबाआीबद्दल म्हटलें आहे, ' मराठी भाषेंत जीं जीं कांही पुस्तकें प्रसिद्ध झालीं होतीं, तेवढीं सारीं तिने वाचलीं होतीं. ' तिला अिंग्रजी येत नसलें तरीहि हें आम्हास अशक्य वाटतें. पृ. १६०, ओळ ८, ' हा प्रकार कांहीसा सामान्य नव्हता '. येथे कदाचित् ' कांही ' अैवजीं ' कांहीसा ' पडलें असावें. तथापि कादंबरी अेकंदरींत वाचनीय आहे आणि कालेजचें वातावरण त्यांत बरोबर दाखवलें आहे. पदवीधरांवर लेखकाचा नेहमीच कटाक्ष असतो, पण पदवीधरांवर हा अन्याय होतो असेंच केवळ म्हणतां येत नाही. पुष्कळ पदवीधरांना पदवीपलीकडे किंमत नसते हें नाकारतां यायचें नाही. **र. धों. क.**

**२ शूर अबला.** लेखक, धनुर्धारी. प्रकाशक, उषा प्रकाशन, औंध. पृ. ४४, किंमत ८ आणे.

या नामांकित लेखकाचें हें छोटेंसें पुस्तक सरकारचा रोष झाल्यामुळे उपलब्ध नव्हतें. त्याची ही नवी आवृत्ति त्यांचे चिरंजीव श्री. श्री. रा. टिकेकर यांनी 'उषा प्रकाशन' मार्फत प्रसिद्ध करवलें आहे. यांत झांशीची राणी लक्ष्मीबाअी, ताअी तेलीण, कित्तूर चन्नव्वा, व उमाबाअी दाभाडे या धाडशी स्त्रियांच्या पराक्रमांची हकीकत थोडक्यांत दिली आहे. स्त्रियांनी गाजवलेल्या मर्दुमकीच्या या वर्णनापासून पुरुषांनाही धडा घेण्यासारखा आहे यांत शंका नाही.

**र. धों. क.**

---

# पत्रव्यवहार

माझा मित्र सुमारें तीस वर्षें वयाचा असून त्यास बायको व दोन मुलेंहि आहेत, पण त्यास बाहेरख्यालीचा नाद असून किराणा मालाचें दुकान असल्यामुळे स्त्रियांची ओळख होते व कबूल होअील त्या स्त्रीशीं तो संबंध करतो. आजपर्यंत वीस अेक स्त्रियांशीं संबंध झाल्याचें तो सांगतो. या दोनतीन महिन्यांत त्याचे दुकानीं साखर मागण्याकरतां सुमारे सतरा वर्षें वयाची अेक बाअी

आली. हल्ली जास्त साखर देतां येत नाही, पण त्यास त्या बाओीचा लोभ सुटल्यामुळे त्याने कोणाकडून तरी साखर आणून देऊन तिची मर्जी संपादण्याचा प्रयत्न केला, परंतु ती बाओी कबूल न होतां त्याची निर्भर्त्सना करून दुकानांतून रागाने निघून गेली. याला सुमारें अेक महिना झाल्यावर तीच बाओी पुनः त्याचे दुकानीं येऊन साखर मागूं लागली. त्यावेळीं त्याने सांगितलें कीं मजजवळ साखर नाही व माझी साखर आपणास गोडही लागणार नाही. तरी ती दुकानीं तशीच बसून राहिली. तेव्हां त्याने तिला सरळ सांगितलें की माझें काम केलेंस तर कोणाकडून तरी साखर आणून देअीन. तेव्हां ती म्हणाली, साखर तर आणून द्या, मग बघतां येअील. त्याने जिवाचें रान करून साखर आणून दिली व त्यावेळीं त्यांचें बोलणें वगैरे होऊन पुढील खेपेस तिने त्याचे दुकानीं येऊन संबंध केला. तरी शंका येते ती हीच की ज्या बाओीने त्याची अेवढी निर्भर्त्सना केली, तीच बाओी केवळ साखरेसाठी त्याच्याकडे येऊन संबंध करील असें दिसत नाही. पैशाच्या आशेने म्हणाल तर माझ्या मित्राची स्थिति पैसे देण्यासारखी नाही. मग हें कसें? आपण या शंकेचें निरसन कराल अशी आशा आहे. आपला **डी. ५०१**

**उ.** स्त्रियांच्या नकाराचा अर्थ पुष्कळ वेळां होकार असतो, असा जगाचा अनुभव आहे. तिने प्रथम निर्भर्त्सना केली ती केवळ त्याने प्रथम भेटीलाच अशी मागणी केल्यामुळे असेल, अशा गोष्टी दमाने घ्याव्या लागतात आणि घाओी झाल्यास त्यामुळे राग येणें शक्य आहे. आपण अितक्या सहज वश झालों असें दिसूं नये, असें स्त्रियांस साहजिकच वाटतें. परंतु ती पुनः आली यावरून तिला त्याचेविषयीं प्रथमपासूनच आकर्षण वाटलें असलें पाहिजे हें उघड दिसतें. पुरुष जितक्या सहज असें आकर्षण दिसूं देतात, तितक्या सहज बायका दिसूं देत नाहींत, कारण त्यांना समाजाची भीति पुरुषांपेक्षां जास्त असते. तेव्हां यांत विशेष आश्चर्य वाटण्यासारखें कांही नाही. **सं.**

---

# शारदेचें पत्र

'बॉंबे टाकीज'चे 'ज्वार भाटा' पाहिलें आहेस का तूं ? या चित्रांच्या व्यापाऱ्यांना नफ्याशिवाय कांही दिसत नाही. बहुजनसमाज खुळा असतो, तेव्हां बहुतेक पैसे त्यांच्याकडून मिळत असल्यामुळे त्यांच्याच बरोबरीला कथालेखकाने जाऊन बसायचें, कोठेही जास्त अक्कल दिसूं द्यायची नाही, हें त्यांचें ब्रीद. या बोलपटाची गोष्ट निव्वळ धार्मिक आहे आणि त्यांतल्या धार्मिक भावना खरोखरच लेखकाच्या असतील असें मला वाटत नाही. असल्या तर त्याची कींवच करावी लागेल. माझ्या मतें ही नुसती धूळफेक आहे. बोलपटांत दोन चार ठिकाणीं नाच घातले की कला संपली. गोष्टींत फारसें नावीन्य नाही. दोन बहिणींपैकी धाकटीचें प्रेम अेकाशीं जुळतें, पण त्याचा बाप त्याचें लग्न मोठ्या बहिणीशीं ठरवतो. तो बराच आजारी असल्यामुळे त्याची अखेरची अिच्छा म्हणून मुलगा धाकट्या बहिणीला दिलेलें वचन मोडून त्या लग्नाला तयार होतो. आपलें लग्न कोणाशीं होत आहे हें प्रत्यक्ष लग्न लागेपर्यंत दोघांनाही माहीत नसतें. नंतर अर्थातच त्यांना व धाकट्या बहिणीला धक्का बसतो आणि या बहिणीची फसवणूक झाल्यामुळे ती घरांतली कृष्णाची मूर्ति फेकून द्यायला तयार होते. वास्तविक त्याची त्यांत चूक नव्हती, कारण बहिणीचें लग्न होवो अशी तिने प्रार्थना केली होती, त्याप्रमाणें त्या बिचाऱ्यानें लग्न होऊं दिलें. त्याच माणसाशीं हिचें प्रेम जुळलें आहे हें त्याला काय माहीत ? ती मूर्तीला हात लावणार तोंच तिचा बाप तें पाहून संतापतो आणि तिला घालवून देतो. तीही चिडून निघून जाते आणि अेका नाटक मंडळींत सामील होते. बापाला पश्चात्ताप होऊन तो पोलिसाकडून तपास करवतो. हा सुगावा लागल्याबरोबर ती मंडळीच्या मालकाच्या घरीं जाऊन राहते आणि तेथेही पोलीस आल्यावर तिला पळवून नेल्याचा आरोप मालकावर येऊं नये म्हणून त्याने माझ्याशीं लग्न केलें आहे अशी थाप देते. बापाने आग्रह केला तरी ती घरीं जायला कबूल होत नाही. तेव्हां बहीण गरोदर असतांनासुद्धां स्वतः तिला आणायला जाते. तेथे

भांडण होऊन ती मूर्च्छित पडते आणि तिचा नवरा डाक्तराला घेऊन येतो. बाळंतपणाचा प्रसंग आहे असें पाहून डाक्तर तपासतो आणि सांगतो की आओी किंवा मूल यांपैकीं एक कोणीतरी जगेल, दोन्ही जगणें शक्य नाही, आणि नवऱ्याला विचारतो की दोहोंपैकीं कोणाला जगवूं? ही डाक्तराची अक्कल! नवीन होणाऱ्या मुलपेक्षा आओीची किंमत केव्हांही जास्त आहे हें त्याला कळायला पाहिजे होतें. नवरा त्याला तेंच सांगतो आणि धाकटी बहीण हें सगळें अैकून, ज्या कृष्णावरचा तिचा विश्वास उडाला होता, त्याचाच धांवा करायला जाते आणि आओी व मूल दोन्हीही जगावीं अशी प्रार्थना करते. अर्थातच डाक्तर श्रीकृष्णापुढे काय करणार? त्याचें मत खोटें ठरून तीं दोघेंही जगतात. आणि त्या आनंदांत ती नाटकमंडळीच्या मालकाशीं लग्न करायला तयार होते. तिने जर प्रार्थना केली नसती तर श्रीकृष्ण मधें पडला नसता, आओी किंवा मूल यांतलें अेक कोणीतरी, डाक्तराच्या मर्जीप्रमाणें, मरणार हें त्याला चालत होतें. पण विश्वास उडालेली एक मुलगी पुन्हा आपली प्रार्थना करायला लागली तेव्हां तिचें न ऐकून कसें चालेल? म्हणून त्याने चमत्कार करून दोघांनाही जगवलें! म्हणजे नवरा, बायको आणि मूल या सगळ्यांचें भवितव्य या प्रार्थनेवर अवलंबून होतें. तिचा विश्वास उडाल्यामुळे तिला प्रार्थना करावीशी वाटली नसती, तर बायको किंवा मूल अेक कोणीतरी मरणार होतें. प्रार्थना केल्यामुळे तीं दोघें जगलीं. या मुलीच्या विश्वासाची किंवा अविश्वासाची अशी काय किंमत होती की त्याकरतां श्रीकृष्णाने तिसऱ्याच कोणाचे तरी प्राण वांचवावे? असल्या गोष्टी खऱ्या वाटायला धार्मिक लोकांचें बथ्थड डोकेंच पाहिजे. आणि जी मुलगी पुन्हा प्रार्थना करायला लागते, तिचा विश्वास उडाला होता हें कोणाला खरें वाटेल? ती कांहीं वेळ देवावर रागावली होती. पाऊस पडला नाही म्हणजे तो पडेपर्यंत देवाची मूर्ति पाण्यांत बुडवून ठेवणारे लोक असतातच की नाही? असला आचरटपणा अेखाद्या आधुनिक बोलपटांत दाखवावा ही गोष्ट लज्जास्पद आहे. हा बोलपट बावळट लोकांकरतां आहे, समंजस माणसांकरतां नाही.

कांग्रेसवाल्यांचें सत्य म्हणजेच असत्य, याचा पुरवा अनेक वेळा मिळालेला आहे, पण त्याचें आणखी अेक उदाहरण म्हणजे दुधाच्या पुडीसंबंधानें त्यांनी केलेला खोटा प्रचार. सरकारने केलेल्या सर्व गोष्टी वाअीट म्हणायच्या, अेवढाच त्यांतला उद्देश. दुधाच्या पुडींत चरबी नसते, अेवढाच दोष त्यांत आहे आणि तीही गाईच्या दुधाची असल्यामुळें चहाच्या चवींत फरक पडेल हें उघड आहे. परंतु त्यांत हानिकारक असें कांहीही नाही असें तज्ञांचें मत आहे. तरी या लोकांनी सरकारच्या नांवाने शंख करायचा तो केलाच. असा चहा प्याल्याने माझें डोकें दुखूं लागलें असें सांगणारेही अेक गृहस्थ मला भेटले, पण अेकतर तेही थापाडे कांग्रेसवाले असावे, किंवा प्रचाराचा परिणाम त्यांच्या डोक्यावर झाला असावा. हें चालू राहिल्यास कांग्रेसचा सर्व प्रकारचा प्रचार खोटा मानण्याकडे लोकांची प्रवृत्ति होअील हें कांग्रेसवाल्यांनी लक्षांत ध्यावें आणि आचरट थापेबाजीने आपलें हसें करून घेऊं नये. राजकारणाला थापेबाजी लागते हें मला माहीत आहे, पण पचेल अशी थाप द्यायला बरीच अक्कल लागते, ती कांग्रेसवाल्यांजवळ दिसत नाही. शरीराला थोड्याबहुत चरबीची देखील जरूर असते हें खरें, पण चहांतून जें थोडेंबहुत दूध पोटांत जात असेल, तेवढ्याने ती गरज भागण्यासारखी नसते, तेव्हां या मुद्दयांत बिलकुल अर्थ नाही.

येथे नुकतेंच हौशी नाट्यसंघाचें संमेलन झालें. या हौशी नटांना अेक सूचना करावीशी वाटते की केवळ हौसेने नाटकें यशस्वी होत नाहीत, त्याकरतां परिश्रम करावे लागतात. या अेकाच गोष्टीमुळे धंदेवाअीक नाटकांत जरी स्त्रियांचीं कामें पुरुषांनी केलेलीं असलीं, तरी हा दोष ज्यांना खपतो त्यांचे मतें विद्याहरण नाटक सर्वांत चांगलें झालें असें म्हणतात. बाकीच्या सर्व नाटकांत स्त्रियांचीं कामें स्त्रियांनी केलीं होतीं आणि 'निशीकांताची नवरी' हें नाटक चांगलें झालें. 'पराचा कावळा' यांतला पहिला अंक कंटाळवाणा होतो, हा दोष मुख्यतः नाटककाराचा आहे, पण नटांनीही त्याला हातभार लावावा हें बरें नव्हें.

तुझी **शारदा.**

## अेजंटांचीं नांवें

**मुंबई :** श्री. विठ्ठल बाबू बागवे, न्यूज एजंट, दादर.

**पुणें :** अेल्. के. जोशी, बुकसेलर

**कोल्हापूरः** स्कूल अॅन्ड कॉलेज बुकस्टॉल.

**बेळगांवः** जे. एम. माणूरकर खडे बाजार.

**उमरावती :** अण्णा काळे.

**दक्षिण हैदराबादः** महाराष्ट्र न्यूज एजन्सी.

**अहमदनगरः** पी. जी. बापट, बुकसेलर, नवी पेठ.

**कारवारः** मुजुमदार आणि कसबेकर

**निपाणी :** के. एस्. बळगुर्गी

**ग्वाल्हेर :** डोके ब्रदर्स, लष्कर.

**बेलापूर रोड :** ना. भ. पेंडसे.

**भुसावळ :** पी. टी. पुराणिक.

**कराची :** केसरकर ब्रदर्स.

**नागपूरः** सिव्हिल सायकल स्टोअर्स

## आमचेकडे मिळणारा माल

| | |
|---|---|
| डच कॅप (कांहीं आकार, येथे बनवलेले) प्रत्येकीं, | रु. ५. |
| उभट टोपी (लहान, मध्यम किंवा मोठी), प्रत्येकीं | रु. २. |
| राअिट जेली (आम्ही बनवलेली), ... .... | रु. ४. |
| राअिट हेअर लोशन ... ... | रु. ३. |
| कामोत्तेजक नं. १ (बरेच दिवस घेण्याकरतां), | रु. ४. |
| कामोत्तेजक नं. २ (प्रसंगीं घेण्याकरतां) .... | रु. ६. |
| कषायचूर्ण (योनिमार्ग धुण्याकरतां सुवासिक, आकुंचक चूर्ण), बाटली ... ... | रु. २॥. |

राअिट अेजन्सी, १३, नवी भटवाडी, मुंबई—४.



मुद्रण स्थळः—पॉप्युलर प्रिंटिंग प्रेस, १०३, ताडदेव रोड, मुंबई नं. ७

मुद्रक व प्रकाशकः—**रघुनाथ धोंडो कर्वे, राइट् एजन्सी,**
नं. १३, नवी भटवाडी, गिरगांव, मुंबई.

Registered No. B. 2289.

राइट एजन्सी, नं. १३, नवी भटवाडी, मुंबई, नं. ४.

**प्रो. र. धों. कर्वे, एम्. ए. कृत इतर पुस्तकें**

१. **आधुनिक आहारशास्त्र**, किं. १॥रु., ट. ख. ५आणे.
२. **आधुनिक कामशास्त्र** [ सचित्र ], तिसरी आवृत्ति किंमत रु. २॥, ट. ख. ६ आणे.
३. **संततिनियमन** [ सचित्र ], ८ वी आवृत्ति, किंमत १ रुपया, ट. ख. ४ आणे.
४. **गुप्तरोगांपासून बचाव** [ सचित्र ], ३ री आ. किंमत १२ आणे, ट. ख. ४ आणे.
५. **'समाजस्वास्थ्य'** मासिकांतील निवडक लेख, भाग १ ला [ पहिलीं तीन वर्षें ], खलास आहे. भाग २ रा [वर्षें ४–५–६], किं. २–०–०, ट.ख.५आ.
६. **त्वचेची निगा.** किं. ८ आ. ट. ख. ४ आ.
७. **गुरुबाजी** (नाटक) किं. ८ आ. ट. ख. ५ आणे.
८. **वेश्याव्यवसाय,** किं. २ रु., ट. ख. आ.
९. **तेरा गोष्टी,** किं. १ रु. ट. ख. ४ आ.

**डॉ. के. भा. लेलेकृत**

१. **बाहेरख्यालीचे दुष्परिणाम**, २ री आ., किं. ३आ.
२. **मूळव्याध.** किं. २ आ.

**श्री. भास्कर धोंडो कर्वे,** एम्. एड्. कृत,

१. **मी कसा झालों ?** किं. ८ आ., ट. ख. ४ आ.
२. **बालमनाचें रहस्य,** नवी आवृत्ति छापत आहे.

**प्रो. धों. के. कर्वे कृत**

**संक्षिप्त आत्मवृत्त,** किं. १२ आणे ट. ख. ५ आ.